दैनिक अग्रलेख

# नवरंग मित्र मंडळातर्फे बी.सी.जी लसीकरण शिबिराचे आयोजन



पालघर ग्रामीण (अग्रलेख वृत्तसेवा) - नवरंग मित्र मंडळ विक्रमगड सार्वजनिक नवरात्र उत्सव २०२४ च्या सामाजिक उपक्रमाचा भाग म्हणून बीसीजीचे मोफत लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले होते.

जिल्हा परिषद तालुका शाळा विक्रमगड येथे आयोजित करण्यात आलेले हे शिबिर सार्वजनिक आरोग्य विभाग पालघर यांच्या सहकार्याने घेण्यात आले. १८ वर्षावरील नागरिकांसाठी सदर सदर शिबिराच्या आयोजन करण्यात आले होते. शिबिराचा लाभ बहुसंख्य नागरिकांनी घेतला.

नवरंग मित्र मंडळ हे ३६ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. गेली ३५ वर्ष नवरंग मित्र मंडळ सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा व आरोग्य क्षेत्रात अग्रेसर आहे. शिबिर यशस्वीरित्या होण्यासाठी नवरंग मित्र मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी विशेष सहकार्य केले.